# जिल्हाधिकारी कार्यालय,जालना

प्रशासकीय इमारत, स.नं. ४८८, जालना

(जिल्हा नियंत्रणक कक्ष)/(आपत्ती व्यवस्थापन)

दुरध्वनी क्रमांक [02482]-223132 टोल फ्री क्रमांक **1077** फॅक्स क्रमांक (02482)-226477,225326

**E-mail. rdcjalna@gmail.com, jalnaddmo@gmail.com Website: - www.jalna.gov.in, http://59.90.142.57/ddmajalna**

जा.क्र.२०२०/मशाका/जिनिक/आव्यप्र/कावि- दिनांक २३/०३/२०२०

**(ई-मेलने/टपालाने)** **आपत्ती प्राधान्य**

**वाचा:-** १) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.

२) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.

३) महाराष्ट्र शासन अधिसूचना दिनांक १४/०३/२०२०.

**विषय:-** **करोना विषाणू (कोव्हीड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे बाबत. दिनांक २३ मार्च २०२० ते ३१ मार्च २०२० रोजीपर्यंत जिल्हयातील सिमा बंद बाबत.**

## आदेश

ज्या अर्थी, आंतरराष्ट्रीयस्तरावर व देशांतर्गत कोरोना विषाणु संसर्ग बाधितरुग्ण आढळत आहे, तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरुन देशांतर्गत विमान प्रवासाव्दारे प्रवासी भारतात व इतरत्र प्रवास करीत आहे, त्यामुळे कोरोना विषाणचे संशयित रुग्ण जालना शहरातही आढळून आल्याचे निर्दशनास आलेले आहे. त्यामुळे संसर्ग वाढण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणुच्या संसर्गात अधिक वाढ होवू न देता तात्काळ उपाययोजना आखणे आवश्यक आहे.

तथापी माझे असे निर्देशनास आले आहे की, जालना जिल्हयातील नागरीक बाहेर जिल्हयात प्रवास करीत आहेत. तसेच बाहेर जिल्हयातील नागरीकही जालना जिल्हयामध्ये येत आहेत. बाहेर जिल्हयातुन येणारे नागरीक, प्रवासी यांचे मार्फत करोना विषाणूचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याकरिता जिल्हयातील जनतेच्या आरोग्याच्या सुरक्षेच्या दृष्टीने तात्काळ प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, संदर्भ क्र.३ च्या अधिसुचने अन्वये महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम, २०२० लागू केले आहे.

त्या अर्थी **मी रविंद्र बिनवडे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना** जिल्हयात करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून नागरीकांमध्ये करोना विषाणूचा जिल्हयात संसर्ग व प्रादुर्भाव टाळण्यासाठी खालीलप्रमाणे आदेश निर्गमीत करीत आहे.

१) जालना जिल्हयातील सर्व सिमा तात्काळ बंद करण्यात येत आहेत.

२) जिल्हयातील कोणत्याही नागरीकास अत्यावश्यक कारण वगळता बाहेर जिल्हयात जाण्यास मनाई करण्यात येत आहे.

३) जिल्हयातील नागरीक नसलेल्या कोणत्याही व्यक्तीस जिल्हयात अत्यावश्यक कारणाशिवाय प्रवेश करण्यास मनाई करण्यात येत आहे.

४) पूणे-मुंबई व इतर महानगरातून जिल्हयात आलेल्या व्यक्तींना वैद्यकिय कारणाशिवाय घराबाहेर पडण्यास मनाई करीत आहे.

५) शासकीय कर्तव्यावरील अधिकारी/कर्मचारी व अत्यावश्यक सेवा यांचेसाठी हे आदेश लागू राहणार नाहीत.

६) इतर जिल्हयातुन अथवा राज्याबाहेरुन आलेल्या कोणत्याही व्यक्तीस जिल्हा/शासकीय रुग्णालयात येवून वैद्यकिय तपासणी करणे बंधनकारक राहील.

६) जिवनावश्यक वस्तुंची, पेट्रोलीयम पदार्थ, दुध, भाजीपाला, औषधी, धान्य वैद्यकिय उपकरणे इ. वाहतुक करणारी वाहने वगळण्यात यावीत.

७) अत्यावश्यक वस्तु व सेवा कायदा १९५५ मधील वस्तु व सेवांसाठी सदर आदेश लागु राहणार नाही.

जालना जिल्हयाला लागून असलेल्या प्रमुख रस्ते/चेकपोस्ट इ. यादी यासोबत जोडण्यात येत आहेत. सदरील सर्व सिमावर्ती ठिकाणी जिल्हा पोलीस अधिक्षक, जालना यांनी त्यांचेस्तरावर नाकेबंदी करुन वाहनांची तपासणी करावी व त्यांना प्रवेश करण्याकरिता प्रतिबंध करावा. तसेच याव्यतीरिक्त राहिलेल्या सर्व ठिकाणी सुध्दा सदर कारवाई करणे आवश्यक आहे.

**जालना जिल्हयाला लागुन असलेल्या प्रमुख रस्तयांची यादी**

| | |
|---|---|
| **जालना तालुका**<br>१) सेवली - सिंदखेडराजा रोड (सोनदेव चेकपोस्ट)<br>२) न्हावा - सिंदखेडराजा रोड (कडवंची चेकपोस्ट)<br>३) वाघ्रुळ - देऊळगांवराजा रोड (वाघ्रुळ चेकपोस्ट) | **बदनापूर तालुका**<br>१) बदनापूर - औरंगाबाद रोड (वरुड चेकपोस्ट) |
| **भोकरदन तालुका**<br>१) बुलढाणा कडुन येणारा (जायदेववाडी चेकपोस्ट)<br>२) अंजींठा कडुन येणारा चेकपोस्ट (भोरखेडा चेकपोस्ट)<br>३) सिल्लोड भोकरदन चेकपोस्ट जालना जिल्हा हद्द (मालखेडा चेकपोस्ट)<br>४) पारध धाड रस्ता (पारध चेकपोस्ट)<br>५) फुलंब्री राजुर रस्ता (हसनाबाद फाटा)<br>६) अन्वा गोळेगांव रस्ता (आन्वा चेकपोस्ट) | **जाफ्राबाद तालुका**<br>१) माहोरा धाड रस्ता<br>२) वरुड चिखली रस्ता<br>३) टेंभूर्णी देऊळगांव रस्ता<br>४) शिंदी चांडोळ रस्ता<br>५) भारज पिंपळगांव सराई रस्ता |

| परतूर तालुका | मंठा तालुका |
|---|---|
| १) लोणीखुर्द माजलगांव बीड हद्द<br>२) आष्टी पाथरी रोड<br>३) सातोना सेलू रस्ता | १) पाटोदा खुर्द पाथरी रस्ता<br>२) मंठा जिंतुर रस्ता<br>३) तळणी मेहकर रस्ता<br>४) उसवद देवठाण बन कडे जाणारा रस्ता<br>५) बेलोरा राहेरी कडे जाणारा रस्ता |
| **अंबड तालुका**<br>१) माहेर भायगांव औरंगाबाद रस्ता जालना जिल्हा हद्द<br>२) चिंचखेड पाचोड रस्ता<br>३) किनगांव चौफुली औरंगाबाद हद्द<br>४) डोणगांव पाचोड रस्ता<br>५) शहागड पैठण रस्ता बेळगांव चेकपोस्ट<br>६) गेवराई शहागड रस्ता चेकपोस्ट | **घनसावंगी तालुका**<br>१) शिवणगांव बंधारा रस्ता बीड जिल्हा हद्द<br>२) मंगरुळ बंधारा बीड जिल्हा हद्द<br>३) जोगलादेवी बंधारा |

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती, संस्था अथवा संघटना महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम, २०२० चे नियम ११ नुसार, भारतीय दंड संहीता (४५ ऑफ १८६०) कलम १८८, फौजदारी प्रक्रिया संहीता १९७३ चे कलम १४४ तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदर आदेशाची अंमलबजावनी आदेशाच्या दिनांकापासून तात्काळ लागू करण्यात येत आहे.

Ravindra Laxman Binwade

Digitally signed by Ravindra Laxman Binwade
Date: 2020.03.23 22:24:50 +05'30'

**(रविंद्र बिनवडे)**

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना**

**प्रत तात्काळ आवश्यक कार्यवाहीस्तव**

१. पोलीस अधिक्षक,जालना.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.जालना.

३. उपविभागीय दंडाधिकारी,जालना/भोकरदन/परतूर/अंबड.

४. सर्व तहलिसदार तथा कार्यकारी दंडाधिकारी,जालना/बदनापूर/भोकरदन/जाफ्राबाद/परतूर/मंठा/अंबड/घनसावंगी.

५. जिल्हा माहिती अधिकारी,जालना.

६. सर्व मुख्याधिकारी नगर परिषद/नगरपंचायत जि.जालना.

७.उपचिटणीस गृह शाखा, जि.अ.का. जालना.

**प्रतिलीपी माहितीस्तव**

१.मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. मा.संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय मुंबई.